लोकमत



महात्मानगर मैदानावर नाशिक रन २०१८च्या टी शर्ट नोंदणीच्या शुभारंभप्रसंगी एच. बी. थोन्टेश, अतुल खानापूरकर, रंजन ठाकरे, राजाराम कासार, मुकुंद भट, सुधीर येवलेकर, प्रबल रे, संदीप पांडे, अनिल दैठणकर, नितीन देशमुख, व्ही. डी.



लोकमत

# सामाजिक कार्यासाठी धावणार नाशिककर

## नाशिक रन : १३ जानेवारी रोजी आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**सातपूर :** समाजातील गरजू घटकांच्या मदतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने यावर्षीदेखील पुढील शनिवारी (दि. १३) जानेवारीस बहुचर्चित 'नाशिक रन'चे आयोजन करण्यात आल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी शुक्रवारी (दि.५) यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बॉश कंपनीच्या गेस्ट हाऊसमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत बॅनर्जी यांनी सांगितले की, जानेवारी २००३ साली समाजातील मूलभूत सोयी सुविधांपासून वंचित व गरजू घटकांचा विकास डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या गरजा लक्षात घेऊन समविचारी उद्योग घटकांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन नाशिक रनची कल्पना उदयास आली.जानेवारी २००३ साली पहिल्या नाशिक रनची मुहूर्तमेढ रोवली गेली. मागील वर्षी विविध १४ प्रकल्पांना ट्रस्टच्या वतीने मदत देण्यात आली आहे, तर मागील वर्षी जवळपास ७८ लाख रुपयांचा निधी संकलित झाला होता.यावर्षी १६व्या नाशिक रनचे आयोजन १३ जानेवारीला सकाळी ८ वाजता महात्मानगर क्रीडांगणापासून सुरुवात होणार आहे. नोंदणी केलेल्यासाठी लकी ड्रॉचे आयोजन केले असल्याची माहिती उपाध्यक्ष एच.बी.थोन्टेश यांनी दिली.यावेळी राजाराम कासार यांनी चित्रफितीद्वारे नाशिक रनच्या माध्यमातून १५ वर्षांत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या महोत्सवास सर्व स्तरातील क्रीडाप्रेमी व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी ट्रस्टचे सचिव अनिल दैठनकर, खजिनदार राजाराम कासार, विश्वस्त बॉश कंपनीचे उपाध्यक्ष अतुल खानापूरकर, मनुष्यबळ विभागाचे महाव्यवस्थापक मुकुंद भट, संदीप पांडे, प्रबल रे आदी उपस्थित होते. यावेळी नाशिक रनचे विश्वस्त अतुल खानापूरकर, मनुष्यबळ विभागाचे महाव्यवस्थापक मुकुंद भट, सुधीर येवलेकर, संदीप पांडे, अनिल दैठणकर, राजाराम कासार, नितीन देशमुख, व्ही. डी. पुरोहित, विशाल देवरे, गोविंद बोरसे आदी उपस्थित होते.

### नोंदणी केंद्राचा शुभारंभ

- शुक्रवारी महात्मानगर मैदानावर नाशिक रनच्या टी शर्ट नोंदणी केंद्राचा शुभारंभ रंजन ठाकरे व विश्वस्त राजाराम कासार यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच नोंदणी कक्षाची विधिवत पूजा करण्यात आली.